# दुध संकलन केंद्र

जगामध्ये दुधावळ जनावराच्या बाबतीत भारत पहिल्या क्रमांकावर असुन, दुध उत्पादनाच्या बातीत दुसऱ्या क्रमांक लागतो दुध उत्पादनाचा मुख्य स्त्रोत हा ग्रामीण भाग असुन सदर दुध हे शहरी भागामध्ये विक्रीसाठी आणले जाते. परंतु यामुळे शेतकऱ्यांना बऱ्याच अडचणीना सामोरे जावे लागते जसे वेळ, श्रम, वाहतुकी दरम्यान होणारी दुधाची नासाडी, या अडचणीला शेतकरी कंटाळला असुन यामुळे जनावरांच्या संख्येत घट होणे, दुध उत्पादन घट, कमी प्रतीचे दुध इत्यादी दुष्परिणाम झालेले आहेत.  दुधाच्या मागणीचा विचार करता, वरील दुष्परिणामामुळे  दुधाची मागणी व पुरवठा यामध्ये तुटवडा आढळुन येत आहे. यावर उपाय म्हणुन जर दुध संकलनाचे/विक्रीचे ठिकाण दुध उत्पादनाच्या ठिकाणीच असले तर दुधाच्या मागणीचा पुरवठा पुर्ण करणे शक्य होईल. याकरिता गावपातळीवर दुध संकलनाच्या सुविधा पुरविणे अत्यंत गरजेचे आहे. यावर मातकरित कृषी समृध्दी प्रकल्पाच्या माध्यमातुन क्लस्टर गावपातळीवर संकलन केंद्राच्या सुविधा पुरवून दुग्ध व्यावसाईकांना उत्पादन वाढीसाठी प्रवृत्त केले आहे.

**गटाचे नाव** :- संजिवनी संयुक्त दायित्व गट, मोप
ता.रिसोड जि.वाशिम

**विशेष उपक्रम** :- दुध संकलन केंद्र

उददे्श :-

- आर्थिक उत्पन्न वाढविण्यास प्रोत्साहन.
- दैनंदीन गरजाची पूर्तता.
  - वैचारीक व आर्थिक देवाण घेवाण
  - दुग्ध व्यवसायिक शेतक-यांना हक्काची बाजारपेठ गावपातळीवर उपलब्ध करून देणे
  - दुग्ध व्यवसायिक शेतक-यांचा विक्रीवर खर्च होणारा वेळ, पैसा,श्रम ईत्यादींची बचत करणे
  - दुग्ध व्यवसायातील संभाव्य फसवणुकीपासून शेतक-यांचा बचाव करणे
  - गावपातळीवर दुग्ध व्यवसायास चालना देणे
  - संयुक्त दायित्व गटाला रोजगार मिळवून देणे

## संवर्धनाचे वैशिष्ठे :-




- गटाचे नांव:- संजिवनी संयुक्त दायित्व गट, मोप
- गटाच्या अध्यक्षा:- सौ. सुनिता दामोदर नरवाडे
- गटाच्या सचिव:- सौ. सुमनबाई डिगांबर मोरे
- सदस्य संख्या :- ५ महीला
- दुध संकलन केंद्र स्थापना :- १ जानेवारी २०१४
- दैनंदिन दुध संकलन:- ५२५ ली. प्रतीदिवस
- दुधाचा दर:- ४७ रू. प्रती लीटर
- सेवा शुल्क:- १ रू. प्रती लीटर

- दुध उत्पादकाची संख्या:- १२५ शेतकरी
- दुध उत्पादक गावांची संख्या:- ८
- खाजगी डेअरी जोडणी:- निसर्ग डेअरी रिसोड

आर्थिक ताळेबंद :-



- जागा भाडे/ महिना :- २०००/-
- इतर खर्च/ महिना :- ३०००/-
- एकुण दुध संकलन/ महिना :- १५७५० ली.
- सेवा शुल्क प्रती ली. :- १ रू. प्रमाणे
- एकुण उत्पन्न :-रू.१५७५०/- प्रती माह
- निव्वळ नफा :- रू.१०७५०/-
- एकुण उत्पन्न :- रू.१८९०००/- प्रती वर्ष
- प्रति माह एकुण खर्च :- रू ५०००/-
- प्रति वर्ष एकुण खर्च :- रू ६००००/-
- प्रति वर्ष निव्वळ नफा :- रू.१,२९,०००/-
- सेवापुरवठादार:- निसर्ग डेअरी रिसोड

प्रकल्प सहाय्य :-

- प्रशिक्षण व तात्रिक मार्गदर्शन
- बाजारजाळे निर्मीतीतून विक्री व्यवस्थापन
- सेवा पुरवठादार व गटात मध्यस्ताचा दुवा
- साहित्य खरेदीसाठी प्रकल्पातुन अर्थसाहय(IFAD निधी)
- जनावरे खरेदीसा**ठी** गट स्थापन करून बॅकेसोबत जोडणी
- पशुवैद्यकीय सेवा व जनावरे तपासणी शिबीराचे आयोजन

संजिवनी दुध संकलन केंद्राव्दारा इतर सुविधा:-



- रास्त दराने पशु खाद्याचा पुरवठा
- जनावरांसबंधी तज्ञांकडुन तांत्रिक मार्गदर्शन
- वेगवेगळया चारा पिकांच्या लागवडीवि  ायी मार्गदर्शन
- जनावरा सबंधी मासिकपत्र,कालनिर्णय, विशि  ट ऑफर्स इ. चा पुरवठा